# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/01/2024 (सोमवार) सकाळ


## पोलीस अधीक्षक यांच्याकडुन सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व ०७ अंमलदार यांना निरोप समारंभ तसेच पोलीस अंमलदारांना पदोन्नती बहाल

दिनांक ०१/०१/२०२४ रोजी नागपूर (ग्रामीण), पोलीस दलातुन सेवानिवृत्त होणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदारांना पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर (ग्रामीण) येथे निरोप देण्याकरीता आमंत्रित करण्यात आले. यावेळी एका **''निरोप समारंभाच्या''** कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सेवानिवृत्त होणाऱ्या १) पोलीस उपनिरीक्षक श्री. विनायक चंद्रभान नागुलवार, पोलीस स्टेशन सावनेर २) श्रेणी पोलीस उपनिरीक्षक श्री. रणधीर गजाधर सिंह, पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण ३) श्रेणी पोलीस उपनिरीक्षक धनराज शंकरराव सावलीकर, पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण ४) सहायक फौजदार श्री. किशोरसिंह गंभीरसिंह राठोड, पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण ५) श्रेणी पोलीस उपनिरीक्षक श्री. शैलेश जगदीशप्रसाद शुक्ला, मानव संसाधन शाखा नागपूर ग्रामीण ६) सहायक फौजदार श्री. राजेश पिंपळे, अर्ज शाखा नागपूर ग्रामीण ७) पोलीस हवालदार रामदास वालके, पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण यांना पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, नागपूर ग्रामीण यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व भेटवस्तु देवून निरोप देण्यात आला आहे. तसेच सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी अंमलदारांना पोलीस अधीक्षक यांनी त्यांना पुढील आयुष्य सुख समृध्दीचे व आरोग्य संपन्न राहावे अश्या शुभेच्छा दिल्या. सेवानिवृत्ती नंतर त्यांचा कोणत्याही प्रलंबित कार्यालयीन कामकाजात अडथळा होणार नाही अशी ग्वाही पोलीस अधीक्षक यांनी यावेळी दिली. तसेच पोलीस दलातील सेवानिवृत्त पर्यंतचा कालावधी हा यशस्वीरीत्या पार पाडला याबद्दल पोलीस अधीक्षक यांनी सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांची प्रशंसा केली. यावेळी नागपूर ग्रामीण आस्थापनेवरील ०७ पोलीस नायक यांना पोलीस हवालदार आणि ०२ पोलीस हवालदार यांना सहायक फौजदार पदावर मा. पोलीस अधिक्षक यांच्या हस्ते पदोन्नती आदेश प्रदान करण्यात आला.



# गांजा तस्करी करणारा आरोपी ८६ किलो ७२० ग्रॅम गांजासह गजाआड
## —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण ची कारवाई :—

मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार यांचे आदेशाने स्थानिक गुन्हे शाखेचे पथक दिनांक ०१/०१/२०२४ रोजी नागपुर उपविभागात अवैध धंद्यांवर आळा घालणे संबंधाने पेट्रोलिंग करीत असताना पोलीस ठाणे बुट्टीबोरी हद्दीतून तेलंगणा कडून नागपूरकडे गाडी क्र. UP 84 F 8205 चारचाकी वाहनाने अंमली पदार्थ (गांजा) बाळगून वाहतूक करीत आहे. अशी खात्रीपूर्वक माहिती मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पोलीस स्टेशन बुट्टीबोरी परिसरात चंद्रपूर ते नागपूर रोड अमृतसर पंजाबी ढाबा समोर रूईखैरी शिवार येथे नाकाबंदी दरम्यान गाडी क्र. UP 84 F 8205 ची झडती घेतली असता वाहनात नाव **आरोपी नामे— १) इकराम हुसैन इक्बाल हुसैन, वय २१ वर्ष, रा, फतेहगंज पुर्वी त. फरिदपूर जी बरेली (यु.पी) २) राजकुमार अशोककुमार सिवर, वय १९ वर्ष, रा. वॉर्ड नं. १ कलुबास डोगरगढ बिकानेर (राजस्थान)** हे एका पांढऱ्या रंगाच्या बोरीमध्ये गुंगीकारक वनस्पती गांजा बाळगून वाहतूक करतांना मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन १) ८६ किलो ७२० ग्रॅम किंमती ८,६०,०००/—रू. २) गाडी क्र. UP 84 F 8205 किंमती १,५०,०००/—रू. ३) दोन मोबाईल संच किंमती २०,०००/—रू. असा एकूण १०,३०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीविरुद्ध पोलीस ठाणे बुट्टीबोरी येथे कलम २०, २२ एन. डी. पी. एस. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून जप्त मुद्धेमाल, दोन आरोपी व कागदपत्रे पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे बुट्टीबोरी यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से), अपर पोलीस अधिक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, पोलीस उपनिरीक्षक आशीष मोरखडे, सहायक फौजदार महेश जाधव, पोलीस हवालदार अरविंद भगत, गजेंद्र चौधरी, मिलिंद नांदुरकर, संजय बांते, मयूर ढेकळे, सत्यशील कोठारे, पोलीस नायक अमृत किनगे, पोलीस अंमलदार राकेश तालेवार चालक आशुतोष लांजेवार, सुमित बांगडे यांचे पथकाने पार पाडली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर